" राष्ट्रीय रक्त धोरण "
राज्यात अंमलात आणण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक ररसे/२००१/८२७/प्रक्र१९०/आ-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर,२००२

वाचा :- १)शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक ररसे१०९४/सीआर३००/आ-६,
दिनांक ३१ ऑक्टोबर,१९९४
२)शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक ररसे२००१ /८२७/प्रक्र१९०/आ-६,
दिनांक १५ आक्टोबर,२००१
३)पत्र क्र. एस/२०१५/२७/२००२-नॅको (रक्तसुरक्षा), भारत सरकार,
दिनांक ११ जून,२००२

**प्रस्तावना :**

राज्यात शासकीय निमशासकीय व खाजगी अशा एकूण २६३ नोंदणीकृत परवानाधारक रक्तपेढया कार्यरत आहेत. रक्ताचे संकलन, रक्त पिशवीची एच.आय.व्ही., मलेरिया, हिपॅटायटीस बी, सिफिलीस, हिपॅटायटीस सी, इत्यादीसाठी तपासणी व रक्ताचे वितरणाचे कामकाज या रक्तपेढयांमार्फत केले जाते.

संदर्भ क्र.३ अन्वये केन्द्रशासनाने, "राष्ट्रीय रक्त धोरण" देशात अवलंबण्यात आल्याचे कळविले आहे. सदरच्या धोरणानुसार जनतेस सुरक्षित रक्ताचा पुरवठा करण्याची जबाबदारी राज्य शासनावर निश्चित केली आहे. त्या अनुषंगाने राज्यात कार्यरत सर्व शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका संचलीत रक्तपेढयांचे संघटीकरण, आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे गरजेचे आहे. तसेच राज्यात स्वैच्छिक रक्तदान मोहीम अधिक शिघ्रतेने राबवून एकूण रक्त संकलन हे १०० टक्के स्वैच्छिक रक्तदानामधून होईल याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय दिनांक ४ जुलै, १९९६ अन्वये राज्यात सुरक्षित रक्ताचा पुरेसा पुरवठा वाजवी किमतीत होण्याच्या दृष्टीकोनातून सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार "राज्य रक्त संक्रमण परिषदेची" स्थापना करण्यात आली आहे. सदर संस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने तसेच शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका व नगरपालिका रक्तपेढयांचे संघटन, बळकटीकरण व कामकाजात एकसुत्रता साधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबीचा सर्वकष विचार करुन शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

१. राज्यातील शासकीय, निमशासकीय व खाजगी अशा सर्व नोंदणीकृत, परवानाधारक रक्तपेढयांनी त्यांची नोंदणी राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे करणे बंधनकारक राहील. तसेच शासकीय, निमशासकीय, राज्य कामगार विमा योजना, महानगरपालिका, नगरपालिका संचलीत रक्तपेढयांना अन्य रक्तपेढयांचे संघ, खाजगी संस्था अथवा ट्रस्टकडे शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय सदस्यत्व स्विकारण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. जर यापूर्वी शासकीय, निमशासकीय रक्तपेढयांनी अशी मंजूरी घेतली असल्यास ती रद्द समजण्यात यावी.

२. राज्यातील सर्व नोंदणीकृत परवानाधारक रक्तपेढयांनी, राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. या आदेशांचे उल्लंघन करणा-या रक्तपेढयांचे अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेमार्फत चौकशी अंती परवाने निलंबित करण्याचे विशेष अधिकार "राज्य रक्त संक्रमण परिषदेला" राहतील.

३. राज्यात दिनांक १५ ऑक्टोबर,२००२ पासून "सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड" योजना सुरु करण्यात येत आहे. या योजनेची वैशिष्टये खालीलप्रमाणे राहतील :-

अ) कोणत्याही व्यक्तीने शासकीय, निमशासकीय रक्तपेढयांमध्ये स्वैच्छिक रक्तदान केल्यास त्यास राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या वतीने सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड देण्यात येईल.

ब) सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्डधारक व्यक्तीने सदरचे कार्ड महाराष्ट्रात कोणत्याही शासकीय/निमशासकीय रक्तपेढीमध्ये सादर केल्यास, त्याचे कुटुंब, नातेवाईक अथवा मित्रमंडळींसाठी गरजेच्या वेळी एक रक्तपिशवी मोफत पुरविण्यात येईल.

क) सदर कार्डचा ग्राहय कालावधी रक्तदात्याने स्वैच्छिक रक्तदान केल्याच्या दिनांकापासून २ वर्षांपर्यंत राहील.

ड) सदर कार्डचा दुरुपयोग होणार नाही याची जबाबदारी कार्डधारकावर राहील.

ई) सदर कार्ड सादर करुन रक्ताची मागणी रक्तदात्याने केल्यास रक्त उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत रक्तपेढीची राहील.

४. "सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड" योजनेच्या अंमलबजावणीसाठी अत्याधुनिक यंत्रणेचा उदा. संगणक, इंटरनेट, नेटवर्कींग, स्मार्टकार्ड इ. करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यावर येणारा खर्च "राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे" उपलब्ध असलेल्या अनुदानातून करण्यात यावा.

५. शासकीय / निमशासकीय रक्तपेढी खाजगी अथवा इतर सेवाभावी संस्था संचालीत रक्तपेढयांना डेबिट क्रेडीट तत्वावर रक्तपुरवठा करणार नाही. अशा प्रकारचा रक्त पुरवठा करावयाचा झाल्यास व उपलब्ध असल्यास प्रत्येक रक्त पिशवीसाठी रुपये ४२५/- इतके सेवाशुल्क शासन निर्णय जिरुफी १०.००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १० जुले,२००१ नुसार निर्धारित केल्यानुसार आकारण्यात यावे. मात्र बदली रक्तदाता देण्याची सक्ती करण्यात येऊ नये.

६. सदर शासन निर्णय नगर विकास विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र.मो. आडे)
कार्यासन अधिकारी

प्रति,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई